# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३१७- २३** **दिनांक : - १६/०९/२०२३**

## "ऑगस्ट" महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I ७८९/२०२३ भादवी सं.कलम ३०२, २०१, १२० (ब) प्रमाणे दिनांक २५/०८/२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे येथुन ००/२०२३ भादविस कलम ३०२, २०१, १२० (ब) अन्वये पेल्हार पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आला आहे.

दिनांक २१/०८/२०२३ रोजी १८.०० वा. चे पुर्वी धानिवबाग येथील अनुज याचे बांगडी बनविण्याचे गाळयात व इतर ठिकाणी यातील मयत नामे - रियाज अली मुन्सी राजा (मनियार) वय ५५ वर्षे यांची पत्नी मनसुरा खातून हिचा प्रेमी गौंतम पंडीत रा. गणेश नगर, धानिवबाग, नालासोपारा पुर्व याचेशी असलेल्या प्रेम संबधात मयत हा अडसर ठरत असल्याने व त्यांना लग्न करायचे असलेने त्यांनी इतर आरोपी १. अनूज, २. विनीत, ३. जितेंद्र, ४. टेलर यांचे समवेत कट रचुन मयत यास आरोपी १. अनूज, २. विनीत, ३. जितेंद्र, ४. टेलर व इतर ५ ते ६ अनोळखी इसम हे फिरणेसाठी कळंब येथे गेले व मयत याची पत्नी मनसुरा खातून हि व तिचा प्रेमी गौंतम पंडीत असे जिवदानी येथे फिरणेसाठी गेले असताना फिर्यादी यांचा भाऊ यातील मयत हा कळंब येथे गेला असताना ठरलेल्या प्लॅन प्रमाणे यातील आरोपी १. अनूज, २. विनीत, ३. जितेंद्र, ४. टेलर व इतर ५ ते ६ व्यक्ती गौतम पंडीत व फिर्यादी यांची वहिणी मनसुरा खातुन रियाज अली राजा यांनी कट करुन कशानेतरी मयत याचा खुन करुन त्यास जिवे ठार मारले बाबत मयत यांची बहिण श्रीमती. नुरजहॉ आमीर खान, वय ४८ वर्षे, यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास श्री. विजय पाटील पोलीस निरीक्षक, गुन्हे यांच्याकडे देण्यात आला होता.

सदर गुन्हयातील मयत यांची पत्नी श्रीमती. मनसुरा रियाजअली मनिहार, वय- ३५ वर्षे, हिच्याकडे सदर गुन्हयाचे अनुषंगाने तिने इंनक्लाब न्युज लाईव्ह या यु टयुब या सोशल मिडीया समोर दिलेल्या मुलाखती बाबत महिला अंमलदार यांच्या समक्ष पोनि/विजय पाटील यांनी विचारणा केली असता तिने तिचा प्रियकर गौंतम पंडीत व त्यांचे साथिदार १. अनूज, २. विनीत, ३. जितेंद्र, ४. टेलर व इतर ५ ते ६ व्यक्ती यांनी यातील तिचे पती रियाज अली मुन्सी राजा (मनियार) वय ५५ वर्षे यास कट रचुन जिवे ठार मारल्याबाबत हकिगत सांगत होती.

त्यानंतर तिचा प्रियकर गौंतम पंडीत यांच्याकडे विचारपुस करता त्यांने दिनांक २१/०८/२०२३ रोजी तो व श्रीमती. मनसुरा रियाजअली मनिहार, वय - ३५ वर्षे, हे जिवदानी येथे गेले असल्याचे सांगुन यातील मयत त्यांचे मित्र १. अनूज, २. विनीत, ३. जितेंद्र, ४. टेलर व इतर ५ ते ६ व्यक्ती हे कळंब बिच येथे गेले

असल्याबाबत सांगत होता. त्या अनुषंघाने जिवदानी विरार येथिल सीसीटीव्ही फुटेज गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांच्या मार्फतीने तपासले असता ते दिनांक २१/०८/२०२३ रोजी जिवदानी येथे गेले असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यावरुन मयत यांची पत्नी श्रीमती. मनसुरा रियाजअली मनिहार, वय- ३५ वर्षे, हिच्या बोलण्यात संदिग्धता वाटत होती. म्हणुन तिच्याकडे वपोनि/वसंत लब्दे, पोनि/विजय पाटील, सपोनि/सोपान पाटील यांनी महिला अंमलदार यांच्या समक्ष विचारणा केली असता तिने इंनक्लाब न्युज लाईव्ह या यु टयुब या सोशल मिडीया समोर दिलेली मुलाखत हि तिची नणंद सौ. नुरजहॉ आमीर खान, वय - ४८ वर्षे, दिर अजगरअली मनिहार, जेठानी मारुनिस्सा, यांनी धमकाऊन तिस सोशल मिडीया समोर मुलाखत देण्यास सांगितले असल्याबाबत तपासात सांगितले.

तदनंतर मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत १) जितेंद्र प्रसाद यदुनाथ पटेल, वय - २४ वर्षे, रा. गणेशनगर, धानिवबाग, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि.पालघर मुळ रा. ग्राम नारायणपुर, तह. कच्छुआ, जि. मिर्झापुर, राज्य उत्तरप्रदेश हा मुळ रा. राज्य उत्तरप्रदेश येथे पळुन जाण्याच्या तयारीत असतांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे त्यांचा शोध घेवुन त्यास सदर गुन्हयाचे तपास कामी वसई फाटा येथुन ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण पणे चौकशी करुन त्यांने केलेल्या हकिगत कथनावरुन आरोपीत यांने सांगितलेल्या हकिगतीची व इसम नामे संजयसिंग तेजसिंग यादव ऊर्फ टेलर, वय - ३८ वर्षे, रा. साईधाम चाळ, गणेशनगर, धानिवबाग, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर याने सांगितलेल्या हकिकतीचे तसेच ते धानिवबाग नालासोपारा पुर्व ते कळंब बिच अर्नाळा येथिल त्यांच्या जाण्याच्या व येण्याच्या रस्त्यावरील सर्व सीसीटीव्ही फुटेज यांचे विश्लेषण केले असता यातील आरोपीत, मयत, यांचे मित्र असे निळया रंगाच्या थ्री व्हिलर टेम्पो मधुन कळंब येथे जातांना दिसत होते. कळंब येथुन यातील मयत, आरोपीत व त्यांचे मित्र असे परत येतांना कोरोडी बसस्टॉप ते रॉयल ॲम्बीयस हॉटेल असे अंतर सुमोर ०३ मिनटात प्रवास होऊ शकतो. परंतु मयत व आरोपीत यांना सदर आंतर पार करण्यास सुमारे १५ मिनीटे असा कालावधी लागल्याने लागलीच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले. तसेच सदर ठिकाणी असलेला १० वर्षाच्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार बालक यांच्याकडे कौशल्यपुर्वक विचारपुस करता त्यांने आरोपीत व मयत यांच्यात वाद होऊन आरोपीत यांने मयत यास ठोश्याबुक्याने मारहाण करुन त्यांस नाल्यात धक्का मारुन पाडल्याबाबत सांगितले. त्यानंतर आरोपीत जितेंद्र प्रसाद यदुनाथ पटेल, वय - २४ वर्षे, यांच्याकडे सदरबाबत विचारणा करता त्यांने सदर गुन्हयाची कबुली देत मयत यांच्यासोबत झालेल्या किरकोळ वादातुन त्यांने मयत यास ठोश्याबुक्याने मारहाण करुन त्यांस जोराचा धक्का देऊन नाल्यात पाडल्याने तो मयत झाला असल्याबाबत सांगितले. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीत जितेंद्र प्रसाद यदुनाथ पटेल, वय - २४ वर्षे, यानेच यातील मयत रियाज अली मुन्सी राजा (मनियार) वय ५५ वर्षे रा. गणेशनगर, धानिवबाग, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर यास जिवे ठार मारल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचे घटनास्थळ श्रीमती. सिसिलीया मायकलगोन्सालविस यांचे रिकाम्या प्लॉट लगत, श्री. गजानन जगन्नाथ वझे यांचे राहते घराचे समोर, अलाप बंगला, कोरोडी बसस्टॉप जवळ, रॉयल ॲम्बीयस हॉटेल जवळ, नाळा रोडवर, नालासोपारा प. पो. निर्मळ, ता.वसई, जि.पालघर येथे असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचे घटनास्थळ नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत असल्याने सदर गुन्हयाचा पुढील तपास आरोपीतासह नालासोपारा पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी करणारे पेल्हार पोलिस ठाणेचे वपोनि श्री. वसंत लब्दे, श्री. विजय पाटील,पोनि प्रमोद बडाख (गुन्हे शाखा कक्ष ३ )पोलीस निरीक्षक गुन्हे,सपोनि सोपान पाटील, पो.हवा. योगेश देशमुख,तानाजी चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, पो.अं. रवि वानखेडे, संजय मासाळ, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, दिलदार शेख, राहुल कर्पे, अनिल साबळे, सुजय पाटील,सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे,पो.हवा. नामदेव ढोणे,पो.अं. सोहेल शेख,नेम- पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ, ३ विरार,पो.हवा.मुकेश तटकरे, मनोज सपकाळ, अशोक पाटील,पो.अं.राकेश पवार नेम- गुन्हे शाखा कक्ष ३ दिनांक १६/०९/२०२३ रोजी मा. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **" ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-१ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि.श्री. वसंत लब्दे व पो.उप.निरी टेलर (कक्ष ३)

२) दिनांक.२०/०८/२०२३ रोजी २०.३० वा ते २१.०० वा.चे दरम्यान महीला नामे.सौ.सोनाली सुनिल घोगरा वय.३५ वर्षे,रा.नाईकपाडा,देपीवली गांव पो.पारोळ ता.वसई जिल्हा.पालघर हीच्या मानेवर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कोणत्यातरी धारदार हत्याराने वार केल्याने तीला इंदीरा गांधी मेमोरीयल हॉस्पीटल भिवंडी येथे उपचाराकामी तीचे नातेवाईक घेवुन गेले असता तेथील डॉक्टरांनी तीला मृत घोषीत केले. त्यानंतर मांडवी पोलीस स्टेशनचे पोलीसांनी मृतक महिला हीचा भाऊ श्री.अविनाश वसंत मोर वय.३६ वर्षे,रा.पाली पो.पोशेरी ता.वाडा जिल्हा.पालघर यांची फिर्याद घेवुन अज्ञात आरोपी विरुद्ध मांडवी पोलिस ठाणे गुन्हा रजि क्र. २१३/२०२३ भा.दं.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हयातील मयत हीस जीवे ठार मारणा-या अज्ञात इसमाचा शोध घेण्याबाबत वरिष्ठांनी मांडवी पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.मयत महीला राहत असलेले गांव हे आदिवासी पाडा असल्याने सदर गांवामध्ये आणि आजुबाजुला कुठेही सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते,तसेच अज्ञात आरोपीने गुन्हा करताना मोबाईलचा वापर केला किंवा नाही हे

समजुन येत नसल्याने मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करणे जीकरीचे होते,त्यामुळे सदर गुन्हा उघडकीस आणण्याचे पोलीसांसमोर मोठे आव्हान होते.

मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मांडवी पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मयत महीला हीच्या गावात जावुन गावातील लोकांना विश्वासात घेवुन कोणताही तांत्रिक पुरावा नसताना गुप्त माहीती काढुन तीन संशयीत इसमांना ताब्यात घेतले.सदर तीनही इसमांना पोलीस ठाण्यात आणुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करुन मयत महीला ही नेहमी कोणाशी तरी मोबाईलवरुन बोलते व तीचे कोणाशी तरी संबंध आहेत याबाबत मयत महीला हीच्या मुलाने स्वताच्या आईच्या चरीत्र्यावर संशय घेवुन आई घरात झोपलेली असताना आईच्या मानेवर आणि चेह-यावर धारदार लोखंडी पात्याच्या कु-हाडीने जोराने मारुन जीवे ठार मारले असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यास ताब्यात घेतले.

सदरची कामगिरी करणारे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रफुल्ल वाघ,श्री.अशोक कांबळे,पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. संदिप सावंत, बालाजी मुसळे,पो.हवा. लक्ष्मण तरवारे,मोहन जाधव, गजानन देसले, राजेंद्र फड, संदेश घेगडमल,पो.अं. विशाल भगत,गजानन गरीबे,अमोल साळुंखे, गणेश ढमके यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. प्रफुल्ल वाघ

३) विरार पो.स्टे.गु.र.नं. ८१४/२०२३ भादविसं कलम ४२०.३४ प्रमाणे मधील दिनांक १९.०८.२०२३ रोजी सकाळी ११.३० वा चे सुमारास साईबाब मंदिर समोर फुलपाडा विरार पुर्व ता.वसई जि.पालघर येथे दोन अनोळखी आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन फिर्यादी वय ६५ वर्षे यांना बोलले की,तुम्ही चहा पिता का असे विचारुन त्यातील एक इसम फिर्यादीच्या पाया पडु लागला त्यावेळी फिर्यादी त्यास बोलले की तुम्ही कोण मी तुम्हाला ओळखत नाही तेव्हा फिर्यादीच्या खिशात हात घालुन त्यातील एकाने फिर्यादीच्या गळयातील सोन्याची चैन काढुन घेवुन फिर्यादीची फसवणुक केली म्हणुन वर नमुद गुन्हा दाखल केला होता.सदर गुन्हाचा तपास गुन्हे शाखा कक्ष ३ यांचेकडे देण्यात आला.सदर गुन्हाचे घटनास्थळाचे प्राप्त सी.सी.टी.व्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे व गुप्त बातमीदार यांचेकडुन मिळालेल्या माहीतीच्या

आधारे आरेपीत १) रमेश ऊर्फ रम्या विजयकुमार जैसवाल रा.म्हाडा कालनी,चेंबुर,मुंबई २) विशाल ऊर्फ बल्ला ऊर्फ बाळु विष्णु कश्यप रा.सायन माहिम लींक रोड,धारावी,मुंबई यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन फसवणुक केलेले ६,९२,०००/- किंमतीचे १६६ ग्रॅम सोन्याचे दागीने व इतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आले असुन मि.भा.व.वि. व ठाणे शहर आयुक्तालयातील एकुण ८ गुन्हे उघडकीत आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष ३ चे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजीत टेलर, पो.उप.निरी.उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील,मनोज चव्हाण,मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सपकाळ,आश्विन पाटील,पो.अं.सुनिल पाटील,मसुब सागर सोनवणे,प्रविण वानखेडे, गणेश यादव यांचा तसेच स.फौ,संताष चव्हाण नेमणुक सायबर सेल यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक -३ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.उप.निरी. श्री. टेलर

४) मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणा-या फिर्यादी नामे हेमंत गोपाळ गिजे,राह. रुम नं. ५०४ बि.नं. ३, साई एन्क्लेव्ह, साई कमल को ऑप हौसिंग सोसा, वागडनगर रोड, रामदेव पार्क, मिरारोड पुर्व हे दिनांक ३०/०७/२०२३ रोजी सायंकाळी १६.४० वाजता त्यांची पत्नी भाविका व मुलगा ध्रुव यांचेसह रिक्षाने मिरा भाईंदर रोडने काशिमिरा बाजुकडे प्रवास करत असतांना एस.के.स्टोन येथील कुसुम रोल्सजवळील सिग्नलच्या पुढे बस स्टॉपसमोर आलेवेळी रिक्षाचे पाठीमागुन दोन अनोळखी इसम मोटर सायकलवरुन येवुन फिर्यादी याची पत्नी भाविका यांची हॅण्ड बॅग जबरदस्तीने हिसकावुन पळवुन घेवुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गु.रजि.नं. I २८२/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी शोएब हनिफ खान सरगुरु वय ३७ वर्षे रा.रुम नं.२०२, अब्दुला अपार्टमेंट, दुसरा माळा, राशीद कम्पाऊंड, श्रीलंका, कौसा, मुंब्रा कौसा, ता.जि.ठाणे, मुळ

रा.ए/१०३, नुरजहान पॅलेस, रशिद कम्पाऊंड, श्रीलंका, कौसा, मुंब्रा, ठाणे यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न करुन त्यास सदर गुन्हात अटक केली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याचेकडुन चोरी व जबरी चोरी केलेले एकुण ७ मोबाईल, १ चाकु व १ गुन्हयात वापरलेल्या मोटर सायकलचे आर.सी बुक तसेच रोख रक्कम हस्तगत करुन मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील २ गुन्हे व ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ७ गुन्हे, असे एकुण ९ गुन्हे उघड करण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचा तपास मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि.किरण वंजारी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी करणारे मिरारोड पोलीस ठाणेच वपोनि श्री.चंद्रकांत सरोदे स.पो.नि. सपोनि संतोष सांगवीकर, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ.प्रशांत महाले, पो.हवा.प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, राहुल गावडे, पो.अमं.अथर्व देवरयांचा **"ऑगस्ट महिन्यातील उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-१ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. सरोदे व तत्कालीन वपोनि. श्री.बागल

५) तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १५६/२०१६ भादविस कलम ३०२, ४०४, २०१, ३४ प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी चंद्रशेखर रामसागर गुप्ता वय ३० वर्ष रा. केशव अपार्टमेंट, रुम नं २०५, वालईपाडा रोड, संतोषभवन, नालासोपारा पुर्व यांनी दि. १७/०३/२०१६ रोजी १७.०० वाजता ते दिनांक १८/०३/२०१६ रोजी १७.०० वाजता ते दिनांक १८/०३/२०१६ रोजी ००.३० वाजता ००.४५ वाजताचे दरम्यान गुन्हयातील आरोपीत १) शिवाभैया पुर्ण नाव पत्त माहीत नाही २) रवि श्यामवीर डांगुर ३) अभिजित मिश्रा उर्फ कडा उर्फ सचिन ४) कृष्णा कमलेश दुबे यांनी आपसात संगनमत करुन गुन्हयातील फिर्यादी यांचा मयत भाऊ नामे सुभाषचंद उर्फ भालू रामसागर गुप्ता वय २१ वर्ष रा. फिर्यादी प्रमाणे याचे सोबत झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन नायलॉन रस्सीने मयताचा गळा आवळुन त्यास जिवे ठार मारुन त्याचा मृतदेह पुरावा नष्ट

करण्याच्या ईरादयाने गोणीत भरुन त्याचे अंगावर असलेल्या सोन्याची चैन व हाताच्या बोटातील सोन्याची अंगठी व मो.सा.अपहार करुन पळून गेले बाबत फिर्यादी यांनी दिनांक १८/०३/२०१६ रोजी ०३.४५ वाजता दिलेल्या तक्रारीवरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध गंभीर गुन्हयांतील पाहीजे व फरार निष्पन्न परंतु नजेराआड असणारे आरोपीत यांचा शोध घेवून अटक करण्याबाबत वरीष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १५६/२०१६ भादविस कलम ३०२, ४०४, २०१, ३४ प्रमाणे या गुन्हयाचे झाले तपासाबाबत व गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची पोलीस ठाण्यातुन माहीती प्राप्त करण्यात आली. नमुद गुन्हयात १ विधीसंघर्षग्रस्त बालक व २ आरोपीतांना अटक करण्यात आली असून शिवाभैया पुर्ण नाव पत्त्माहीत नाही हा मुख्य पाहीजे आरोपीत असल्याची माहीती निदर्शनास आली. गुन्हयाचे फिर्यादी व साक्षीदार यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांचेकडे गुन्हयाचे घटनेच्या प्रकाराबाबत सविस्तर माहीती प्राप्त करुन सदर माहीतीव्दारे तपास करुन पाहीजे आरोपीत हा रा.मजरा चिल्लीमल राजापुर, जिल्हा-चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश येथील राहणारा असुन त्याचे हातावर असलेल्या टॅटुचे वर्णन आणि बरेच वर्षापुर्वीचा जुना अस्पष्ट फोटो प्राप्त करण्यात आला. मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने नमुद पाहीजे आरोपीताचे निष्पन्न झालेल्या पत्यावर गुप्त बातमीदारांकरवी आरोपीताचा फोटो आणि त्याचे हातावरील टॅटुचे वर्णनावरुन शोध चालू झाला. सदर गुप्त बातमीदारांकडुन प्राप्त जुन्या फोटो आणि टॅटुचे वर्णनाशी मिळता-जुळता व्यक्ती मजरा चिल्लीमल, ता. राजापुर, जिल्हा-चित्रकुट, राज्य-उत्तरप्रदेश परीसरात वास्तव्यास असल्याची माहीती प्राप्त झाल्याने तात्काळ तपास पथक चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश येथे रवाना करुन आरोपीतास दिनांक २७/०८/२०२३ रोजी ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने सदरचा ८ वर्षापुवी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.अटक करण्यात आलेल्या पाहीजे आरोपीताचे नाव :- शिवबाबु उर्फ शिवाभैया जगतपाल निषाद वय-२० वर्ष, रा.- कलेक्टर पुर्वा मजरा चिल्लीमल, ता. राजापुर, जिल्हा-चित्रकुट, राज्य-उत्तरप्रदेश सदर गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान गुन्हयातील ८ वर्ष अटकेपासुन बचाव होण्याकरीता लपत फिरत असलेल्या पाहीजे आरोपीताचा अथक परीश्रम करुन प्राप्त केलेल्या जुना अस्पष्ट फोटो आणि टॅटुचे वर्णन याव्दारे चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश या ठिकाणी गुप्त बातमीदाराकरवी शोध घेवून त्यास अटक करण्यात आले.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा.फौज.रमेश भोसले, संजय नवले, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पो.हवा. चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई, तसेच पो.उप.निरी. राजेश कुमार राय, आरक्षी/ महेंद्रकुमार नेम- सरधुवा पोलीस ठाणे यांचा **"ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड " क्रमांक-२ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. शाहुराज रणवरे

६) दिनांक २८.०८.२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अंमलदार छपरीबन यांना त्यांचे गुप्त माहीतीदाराकरवी माहीती मिळली कि प्रकाश भाडु नावाचा इसम त्याचे राहते घरी रुम नं. ३०२ दत्त आशिर्वाद इमारत सेंट्रल पार्क या ठिकाणी एम.डी. नावाचे अंमली पदार्थाची विक्री करित असुन, आज रोजी अंमली पदार्थ खरेदी करण्याकिरता त्याचेकडे ४ ते ५ राजस्थानी लोक आलेले आहेत. सदरबाबत त्यांनी लागलीच वपोनि/श्री शैलेंद्र नगरकर यांना माहीती दिली. वपोनि/नगरकर यांनी लागलीच पोनि/ सुधीर चव्हाण यांना छापा कारवाईचे आयोजन करणेबाबत आदेशित केले, त्यावरुन खालील ५ इसमांना ताब्यात घेण्यात आले १)दिनेशकुमार जावंताराम बिष्णोई वय ३१ वर्षे याचे अंगझडतीत एकुण ५९ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला २)सुनिल बिराराम बिष्णोई वय ३० वर्षे अंगझडतीत ५५ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला ३) ओमप्रकाश क्रिष्णराम किलेरी वय ३० वर्षे याचे अंगझडतीत ५५ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला .४)लादुराम हरिकिसन बिष्णोई वय ४० वर्षे याचे अंगझडतीत २६ ग्रॅम एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला ५) प्रकाशकुमार पुनमाराम बिष्णोई वय २३ वर्षे याचे अंगझडतीत १५ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला आहे. त्याप्रमाणे वर नमुद आरोपीत यांचे अंगझडतीत एकुण २१० ग्रॅम वजनाचा २१,००,०००/- रुपये किंमतीचा एम.डी. अंमली पदार्थ व मोबाईल फोन मिळुन आले असुन सदरचा अंमली पदार्थ त्यांचे ओळखीचा पाहिजे आरोपीत प्रकाश बेलाराम भादु. रा. हेमागुडा ता. चितलवाना जि. सांचोर सध्या रा. रुम नं. ३०२ दत्त आशिर्वाद इमारत सेंट्रल पार्क नालासोपारा पुर्व याचेकडुन खरेदी केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच सदरचा अंमली पदार्थ राजस्थान येथे विक्री करित असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीत याचेविरुद्ध तुळींज पोलीस ठाणे गु.रजी.नं. ६१७/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ क, २१ क, २९ प्रमाणे दिनांक २८.०८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी करणारे तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, स.पो.नि. एम.डी.म्हात्रे, पो.उप.निरी. बि.एस.बांदल, स.फौ. सुतनासे, पो.हवा.तुकाराम माने, आनंद मोरे, उमेश

वरठा, पांडुरंक केंद्रे, पो.अं. कदम, छपरीबन,राहुल कदम यांचा **“ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड” क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. शैलेंद्र नगरकरे

७) दिनांक ०४/०७/२०२३ रोजी फिर्यादी श्री.अखिलेश रामबाबु चौरसिया, वय ४० वर्षे, धंदा- नोकरी, रा.आदर्शनगर पडखळपाडा, आचोळे डोगरी, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर यांची मुलगी वय १६ वर्षे.७ महीणे, १० दिवस, हिस कोणीतरी अज्ञात इसमाने तिस कशाचे तरी आमीष दाखवून फूस लावून पळवून नेलेबाबत आचोळे पोलीस ठाणे गुरक्र. ३२९/२०२३ भा.दं.वि.सं कलम ३६३ प्रमाणे दि.०४/०७/२०२३ रोजी १९.१७ वा. गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमुद गुन्हा दाखल झालेपासुन प्रथम तपास पोउनि/संदिप भोसले यांनी केला होता परंतु अपहृत मुलगी अथवा आरोपीत मिळुन आला नाही.तदनंतर नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/ रेख्रा पाटील यांचेकडे देण्यात आला नमुद तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास होती घेतल्यानंतर फिर्यादीचे राहते परिसरात पुन्हा- पुन्हा जावुन तपास केला असता मिळालेल्या माहितीच्या आधारे पेन, ता.पनवेल, जि.रायगड येथे जावुन तपास करुन तसेच तांञिक विश्लेषण करुन साक्षीदार यांचेकडे तपास केला परंतु अपहृत मुलीचा शोध लागला नाही. त्यानंतर पुन्हा मुरबाड मुरबाड व कुडवली एम.आय.डी.सी. मधील सुमारे १५० कंपीनीमध्ये अपहृत हिचा शोध घेतला परंतु अपहृत मुलगी मिळुन आली नाही म्हणुन एम.आय.डी.सी. परिसरातील कमी पैशामध्ये भाडे तत्वावर भेटणाऱ्या रुमबाबत माहिती घेवून त्या परिसरातील सुमारे ७० रुम चेक केल्या असता एका रुम मध्ये अपहृत मुलगी मिळुन आली तिस पोलीस ठाणे येथे घेवून येवून तिच्याकडे विचारपुस केली असता तिची एका मुलीशी मैत्री होती व ते अपहृत मुलीच्या आईस आवडत नव्हते म्हणुन तिचे आईवडील तिस पुढील शिक्षणासाठी गावी पाठविणार होती म्हणुन ती कोणास काहीएक न सांगता स्वत:हुन निघुन जावून मुरबाड येथे कंपनीत काम शोधुन काम करत होती असे निष्पन्न झाल्याने अपहरीत मुलगी हिस सुखरुप तिचे आई-वडीलांचे ताब्यात रितसर कारवाई करुन देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी करणारे आचोळे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब रा.पवार, पो.नि. विवेक सोनवणे (गुन्हे), म.पो.उप.निरी. रेख्रा पाटील, व पो.अं. शिवराम शिंदे यांचा **“ऑगस्ट**

**महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-४** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. बाळासाहेब पवार

८) सायबर गुन्हे कक्ष व गुन्हे शाखा कक्ष ३ यांनी केलेल्या यांनी सातत्यपुर्ण तपास करुन व योग्य तांत्रिक विश्लेषण व बुध्दीकौशल्याने तपास करून चांगली कामगीरी केल्याबाबत पोनि. संजितकुमार गुंजकर,पोनि. शाहुराज रणवरे (कक्ष-२), स.पो.नि. सुहास कांबळे (कक्ष-२), सागर शिंदे (कक्ष-२) स्वप्निल वाव्हळ, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर स.फौ. संतोष चव्हाण पो.अं. गणेश इलग, प्रविण आव्हाड, म.पो.अं. १३१०७ पल्लवी निकम सर्व नेमणुक - सायबर गुन्हे शाखा, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.अं. अमोल कोरे, पो.हवा. सुधिर नरळे प्रफुल्ल पाटील नेमणुक कक्ष-२ यांचा "ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-५ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.



मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोनि. श्री.सुजितकुमार गुंजकर व पोनि.श्री शाहुराज रणवरे

---ooo---